


■ २२ कॅरेट सोने दर : १,३७,९००/- ■ चांदी दर : २,४५,०००/-

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

सिंधुदुर्ग • मंगळवार २३ जून, २०२६

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक २२४ • पाने २२+१६+३२ • ₹ ५.००

# विधानपरिषद निवडणुकीत मविआचा सुपडासाफ

**११ पैकी १० जागांवर महायुतीचा विजय**

## नाशिकमध्ये उलटफेर, शिवसेनेला धक्का देत अपक्ष उमेदवार गोकुळ गीते विजयी

**मुंबई (प्रतिनिधी)**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या विधान परिषदेच्या ११ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीने १० जागांवर एकतर्फी विजय मिळवत आपला वरचष्मा सिद्ध केला. मात्र, या निवडणुकीत नाशिक मतदारसंघातून अत्यंत धक्कादायक निकाल समोर आला आहे. वरिष्ठांच्या मनधरणीनंतर शिवसेना उमेदवाराविरोधातील तलवार म्यान करणाऱ्या अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांचा अनपेक्षित विजय झाला आहे. नाशिकच्या एका जागेचा अपवाद वगळता नागपूर, जळगाव, भंडारा-गोंदिया, नांदेड, सांगली-सातारा, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या सर्वच प्रमुख जागांवर महायुतीचा झेंडा फडकला आहे. आधीच ६ जागा बिनविरोध खिशात टाकणाऱ्या महायुतीने या निकालांसह एकूण १७ पैकी १६ जागांवर विजय मिळवला आहे.

सोमवारी सकाळी मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर नाशिकमधील सस्पेन्स कमालीचा वाढला होता. नाशिक स्थानिक स्वराज्य मतदारसंघाच्या निवडणुकीत सुरुवातीपासूनच प्रचंड राजकीय नाट्य पाहायला मिळाले होते. भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन आणि उदय सावंत यांनी गोकुळ गीते यांनी केलेल्या मनधरणीनंतर त्यांनी आपला अर्ज कायम ठेवत महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, प्रत्यक्ष निकालाच्या दिवशी मोठा उलट फेर पहायला मिळाला. कोणताही जाहीर प्रचार न करता केवळ स्थानिक पातळीवरील अंतर्गत गणितांच्या बळावर अपक्ष गोकुळ गीते यांनी विजय मिळवला.

(पान ४ वर)



**कोणत्या पक्षाला किती जागा?**

| | |
|---|---|
| एकूण जागा | १७ |
| भाजप | ११ |
| शिवसेना | ०३ |
| राष्ट्रवादी | ०२ |
| इतर | ०१ |

### बिनविरोध

- प्राजक्त तनपुरे (भाजप) – अहिल्यानगर
- अरुण लखानी (भाजप) – वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली
- रविंद्र फाटक (शिवसेना) – ठाणे-पालघर
- दुष्यंत चतुर्वेदी (शिवसेना) – यवतमाळ
- विक्रम काकडे (राष्ट्रवादी) – पुणे
- अनिकेत तटकरे (राष्ट्रवादी) – रायगड- रत्नागिरी- सिंधुदुर्ग

### मतदारसंघनिहाय निकाल

**१) सोलापूर** – एकूण मतदार ६१६
राजेंद्र राऊत (भाजप) – ४८३
वसंतराव देशमुख (शरद पवार गट) – ११८

**२) जळगाव** – एकूण मतदार ६३०
नंदकुमार महाजन (भाजप) – ५७७
शरद तायडे (उबाठा गट) – ५

**३) सांगली सातारा** – एकूण मतदार ८९५
धैर्यशील कदम (भाजप) – ५९१
अभयसिंह जगताप (शरद पवार गट) – २९५

**४) नांदेड** – एकूण मतदार ४५२
अमरनाथ राजूकर (भाजप) -३३९
कृष्णा आष्टीकर (उबाठा गट) – ८४

**५) भंडारा- गोंदिया** – एकूण मतदार ४५७
अविनाश ब्राह्मणकर (भाजप) – ३०४
नरेश ईश्वरकर (मविआ पुरस्कृत) – १५२

**६) अमरावती – एकूण** मतदार – ४५१
डॉ. प्रविण पोटे (भाजप) – ३९०
निलेश विश्वकर्मा (वंचित आघाडी) – ३१
हर्षजित देशमुख (काँग्रेस) – ०

**७) धाराशीव-लातूर-** बीड – एकूण मतदार – ९८८
बसवराज पाटील (भाजप) -८४५
महेश देशमुख (काँग्रेस) – १२४

**८) छत्रपती संभाजीनगर-** जालना- एकूण मतदार – ६३७
सुहास शिरसाट (भाजप) – ४५४
गणेश लोखंडे (उबाठा गट) – १३४

**९) नागपूर** – एकूण मतदार – ८३६
डॉ. राजीव पोतदार (भाजप) – ६८२
अतुल लोंढे (काँग्रेस) – १३०

**१०) परभणी** – हिंगोली – एकूण मतदार – ४६६
सईद खान (शिवसेना) – २४२
डॉ. विवेक नावंदर (उबाठा गट) – १५९

**११) नाशिक** – एकूण मतदार – ६१९
गोकुळ गिते (अपक्ष) – ३५७
नरेंद्र दराडे (शिवसेना) – २४८

# कोणतेच ऑपरेशन अर्धवट करत नाही : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## उबाठाच्या ६ खासदारांचा शिवसेनेत प्रवेश; लोकसभा अध्यक्षांकडे सर्व प्रक्रिया पूर्ण केल्याची प्रतिक्रिया

**मुंबई (प्रतिनिधी)**

'ऑपरेशन टायगर' अंतर्गत बंडखोरी केलेल्या उबाठा गटाच्या सहा खासदारांनी सोमवारी (दि. २२) शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या हाती भगवा दिला. त्याचवेळी, "कायद्याच्या आणि संसदीय चौकटीत लोकसभा अध्यक्षांकडे आम्ही ही प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. आम्ही कोणतेच ऑपरेशन अर्धवट करीत नाही, फुल प्रुफ करतो. आज सगळे तुमच्यासमोर आहे. 'ऑपरेशन टायगर' यशस्वी झाले आहे", अशी प्रतिक्रिया शिंदे यांनी दिली.

यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर बंडखोर खासदार संजय जाधव, ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह शिवसेना नेते गजानन कीर्तिकर, रामदास कदम उपस्थित होते. प्रसारमाध्यमांना संबोधित करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "आज व्यासपीठावर शिवसेनेचे सहा 'टायगर' उपस्थित आहेत. माध्यमांनी ज्याला 'ऑपरेशन टायगर' नाव दिले होते, ते आज शंभर टक्के यशस्वी झाले आहे. विशेष म्हणजे आमच्याकडे आता 'ट्रिपल संजय' आले आहेत. खासदार संजय जाधव, संजय दिना पाटील आणि संजय देशमुख. त्यामुळे आता बाकी संजयची (संजय राऊत) गिनती शून्य झाली आहे, त्याचे नाव घेण्याचीही मला गरज वाटत नाही. आज वंदनीय बाळासाहेब ठाकरेंच्या मूळ विचारांवर निष्ठा ठेवणारे कट्टर शिवसैनिक खासदार खऱ्या शिवसेना परिवारात सामील झाले आहेत", असेही ते म्हणाले.



उबाठा गटाने केलेल्या तुडवा-तुडवीच्या भाषेला उत्तर देताना शिंदे म्हणाले, "आम्ही कोणाला उगाच अडवायला किंवा कोणाला तुडवायला आलेलो नाही, तर बाळासाहेबांची शिवसेना महाराष्ट्रभर वाढवायला आलो आहोत. पण, जर कोणी आमच्या वाटेला जाण्याचा प्रयत्न केला किंवा आम्हाला आडवे आले, तर त्यांना बाळासाहेबांच्या शिवसेनेचा अस्सल हिसका काय असतो,

(पान ४ वर)

# उद्धव ठाकरेंनी आधीच खबरदारी घ्यायला हवी होती

## आमदार निलेश राणे यांचा टोला

**मुंबई**

'ऑपरेशन टायगर' अंतर्गत उद्धव ठाकरे गटाच्या ६ खासदारांनी बंडखोरी करत शिवसेनेत प्रवेश केला आहे. या पार्श्वभूमीवर, ठाकरे यांनी तातडीने आपल्या सर्व आमदारांची बैठक बोलावली. यावर आमदार निलेश राणे यांनी कडक शब्दांत टीका केली असून, "उद्धव ठाकरेंनी ही खबरदारी आधीच घ्यायला हवी होती", असा टोला लगावला आहे.



मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरबाहेर माध्यमांशी संवाद साधताना आमदार निलेश राणे म्हणाले, "उद्धव ठाकरेंनी आधी आपल्या पक्षावर आणि नेत्यांवर लक्ष दिले नाही. आता पायाखालची जमीन निसटून गेल्यानंतर कसली खबरदारी घेताहेत?" खासदारांच्या पक्षप्रवेशाबाबत बोलताना ते पुढे म्हणाले, "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील शिवसेनेत प्रत्येकाला योग्य मानसन्मान मिळतो. याउलट, त्यांच्या आधीच्या पक्षात (उबाठा) कोणालाही मानसन्मान नव्हता, तिथे कोणी कोणाचे ऐकून घेत नव्हते आणि नेतेही भेटत नव्हते. लोकप्रतिनिधींमध्ये ही चीड निर्माण होणे स्वाभाविक होते.

(पान ४ वर)

# पालकमंत्री नितेश राणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत जनसेवेचा वसा

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात सेवाभावी उपक्रम

**कणकवली**

महाराष्ट्र राज्याचे मत्स्य व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या मंगळवारी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. पालकमंत्री नितेश राणे यांनी उत्सवी कार्यक्रम घेऊ नयेत अशा सूचना कार्यकर्त्यांना दिल्यानंतर जनसेवेचे आणि जन उपयोगी असतील असे कार्यक्रम जिल्ह्यात आयोजित करण्यात आले आहे. ठिकठिकाणी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाणार आहे छत्र्यांचे वाटप केले जाणार आहे वेगवेगळ्या फळझाडांचे, आयुर्वेदिक उपचारासाठी उपयोगी ठरणाऱ्या झाडांचे वृक्षारोपण केले जाणार आहे. मोफत वृक्ष वाटप कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. प्रत्येक तालुक्यात रक्तदान शिबिर रुग्णांना फळ वाटप गरजूंना साहित्य वाटप असे सेवाभावी उपक्रम पालकमंत्री नितेश राणे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आले आहेत.




